॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

Established on 17th September, 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

ESTABLISHMENT SECTION

Phone: (02462) 215575
Fax : (02462) 215572

Website : www.srtmun.ac.in
E-mail : drestt@srtmun.ac.in


जा.क्र.:आस्था/३/२०२४–२५/२८८१

दिनांकः ११/१२/२०२४

## परिपत्रक

संदर्भ: १.आस्था/३/२०१८–१९/२४०६, दिनांक २१/०९/२०१८
२.आस्था/३/२०१९–२०/३४६७, दिनांक १३/०१/२०२१
३.आस्था/३/२०२१–२२/४०६९, दिनांक २४/११/२०२४

प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापीठ निधीतून (विशेष योजनेअंतर्गत) कार्यरत कर्मचाऱ्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, दि.०५/०९/२०२४ रोजी संपन्न झालेल्या मा.व्यवस्थापन परिषद बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र. ०५/१०२–२०२४ नुसार विशेष रजेमध्ये १० विशेष रजांची वाढ करण्यात आली असून सदर रजा खालील नियमानुसार उपभोगता येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

१. विद्यापीठ निधीतून कायम कर्मचाऱ्यांना किरकोळ रजे व्यतिरिक्त असलेल्या २० विशेष रजा मध्ये १० विशेष रजांची वाढ करुन त्या एकूण ३० (तीस) विशेष रजा एका कॅलेंडर वर्षात देण्यात येत आहेत. ही वाढ दिनांक ०१ जानेवारी, २०२५ पासून लागू राहील.
२. प्रशासनास गरज असेल त्यावेळी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच सदर विशेष रजा ह्या जमा राहणार नाहीत.
३. तसेच सदर रजा कर्मचाऱ्यांचा गोपनीय अहवाल तापासून त्यांना विशेष रजा देण्यात याव्यात.

तरी विद्यापीठ नीधीतील कर्मचाऱ्यांना जानेवारी–२०२५ पासून मा.संचालक/विभाग प्रमुख यांच्या पूर्व परवानगीने सदरील रजा मान्य करुन घेता येईल. रजेवर जाण्यापूर्वी रजा मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

विशेष रजेमध्ये सुटी आल्यास ती रजा सलग समजण्यात यावी.

तसेच विशेष रजा व इतर कोणतीही रजा यादरम्यान सुटी आल्यास ती रजा सलग समजण्यात यावी. सदरील रजेचा हिशोब हा किरकोळ रजेच्या कार्डावर त्या त्या वर्षी ठेवण्यात यावा. सदर जबाबदारी संबंधित कर्मचारी व विभागप्रमुख यांची राहील.

प्र.कुलसचिव

**प्रत कार्यवाहीस्तव :**

१. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
२. संचालक तथा विभाग प्रमुख सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३. संचालक, उपकेंद्र, पेठ, लातूर, प्रस्तुत विद्यापीठ.
४. प्रभारी संचालक, उपपरिसर परभणी, प्रस्तुत विद्यापीठ.
५. प्राचार्य, न्यू मॉडेल, डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ.
६. समन्वयक, कै.उत्तमराव राठोड अदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
७. सहाय्यक कुलसचिव, सभा व निवडणुक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
८. सिस्टीम एक्सपर्ट, संगणक केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी).

**प्रत माहितीस्तव:**

मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.